**Celebration of World Coconut Day**
**02/09/2023**

# विवेकानंद कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागामार्फत जागतिक नारळ दिन साजरा




**कोल्हापूर** : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने २ सप्टेंबर जागतिक नारळ दिनाचे औचित्य साधून नारळाच्या विविध पाककृती, कलाकृती आणि नारळाची उपयुक्तता दाखवणाऱ्या भित्तीपत्रिकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

आपल्या देशात अनेक शतकांपासून नारळाचे आध्यात्मिक आणि औषधी मूल्य आहे. नारळाची सार्वत्रिक उपयोगता पाहता नारळ लागवड आणि उद्योगातून चांगला रोजगार मिळू शकतो. यासाठी नारळाचे उत्पादन, महत्त्व आणि सर्वसामान्यामध्ये जागरुकता वाढविण्याच्या उद्देशाने वनस्पतीशास्त्र विभागाने भरवलेले हे नारळी प्रदर्शन उपयुक्त आणि फायदेशीर ठरेल असे मत कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मांडले. यावर्षी 'वर्तमान आणि भावी पिढीसाठी नारळाचे क्षेत्र जतन करा' ही नागतिक दिनाची संकल्पना आहे.

या कार्यक्रमाचे नियोजन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी केले. आभार बी.एस्सी.भाग-१ ची विद्यार्थिनी साक्षी चौगुले हिने मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अनुराधा मराठे व संजना राठी यांनी केले. यासाठी विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास विविध विभागाचे प्राध्यापक व बी.एस्सी.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD JUNE 1964
(Empowered Autonomous)